PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Amar bhoopali
Year: 1951

Song: Chabidar surat sajiriLyricist: Shahir Honaji Bala

छबीदार सूरत साजिरी
दिसे गोजिरी
बरी आवडलीस माझ्या मना
घडी घडी अरे मनमोहना
हसूनी गुणी जना
देखता नको रे बोलू मशी
घडी घडी अरे मनमोहना
हसूनी गुणी जना
देखता नको रे बोलू मशी
भरम धरील जन
तुझा न् माझा
भरम धरील जन
भरम धरील जन
तुझा न् माझा
का पुरती चौकशी
सजणा नको रे बोलू मशी
सजणा नको रे बोलू मशी
छबीदार सूरत साजिरी
दिसे गोजिरी
बरी आवडलीस माझ्या मना
कुठे दिसेना दूजा पुरूष मज
कुठे दिसेना दूजा पुरूष मज
तुजसम रे देखणा
सजणा तुजसम रे देखणा
तुझी प्रीत लाधली कुठून
रोज नित उठून तूटून
जीव पडतो झाले पिसी
सजणा नको रे बोलू मशी
सजणा नको रे बोलू मशी

घडीघडी अरे मनमोहना
हसूनी गुणी जना
देखता नको रे बोलू मशी

दिसतेस चटक चांदणी
चांदणी चांदणी
दिसतेस चटक चांदणी
अगे साजणी
मनी तू ठसलीस अमुच्या गडे
मनी तू ठसलीस अमुच्या गडे
छंद लागला तुझा आम्हाला
रात न् दिन फाकडे
रात न् दिन फाकडे
निज ध्यास सदा अंतरी
निज ध्यास सदा अंतरी
फिदा तुजवरी
धरे मी सिद्ध्ध करूनिया विडे
धरे मी सिद्ध्ध करूनिया विडे
एकांती मुखी घालता चकाकतील
एकांती मुखी घालता चकाकतील
माझ्या हातातील चुडे
माझ्या हातातील चुडे
आ...
इश्काची चटक लागली
इश्काची चटक लागली
जीवा चांगली
रंगली वृत्ती तुजपाशी
इश्काची चटक लागली
जीवा चांगली

Literacy for a Billion

रंगली वृत्ती तुजपाशी
सजणा नको रे बोलू मशी
सजणी नको गं बोलू मशी
घडीघडी अरे मनमोहना
हसूनी गुणी जना
देखता नको रे बोलू मशी

इश्काची चटक लागली
इश्काची चटक लागली
जीवा चांगली
रंगली वृत्ती तुजपाशी
रंगली वृत्ती तुजपाशी

सजणा...
सजणा नको रे बोलू मशी
सजणा नको रे बोलू मशी
घडीघडी अरे मनमोहना
हसूनी गुणी जना
देखता नको रे बोलू मशी
घडीघडी अरे मनमोहना
हसूनी गुणी जना
देखता नको रे बोलू मशी

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*